प्रकाशकार्याचे वृत्तपत्र



महर्षी अमर (१९१९-१९८२)

ऋषींनी शिकवले तसे
आम्ही ध्यान शिकवतो.

### प्रकाश

सृष्टीमागील बुद्धिमान शक्ती आहे. प्रकाश म्हणजे स्वतः परमेश्वरच.

### प्रकाशकार्य

सर्वोत्तम जीवन जगण्यासाठी, सर्व जीवांना त्यांच्या जाणीवेची आणि अनुभवाची पातळी उंचावण्यात मदत करणे आहे.

### प्रकाशजीव

या आणि उच्च जगात राहणारे ऋषी आहेत. ते ज्ञानाचा प्रकाश आणि शक्ती गोळा करतात आणि पसरवतात.

### सप्तऋषी

सर्वोच्च आध्यात्मिक अधिकारी आहेत. ते निवडलेले महात्मे आहेत. ते, सर्व जीवांना इथे शांती आणि परिपूर्णतेचे जीवन जगण्यासाठी आणि त्यांचे मूळ म्हणजे प्रकाशाकडे परत जाण्यासाठी त्यांचे मार्गदर्शन करतात.

### महर्षी अमर

प्रत्यक्ष सप्तर्षींच्या संपर्कात असणारे एक विशेष महात्मे होते. त्यांनी उच्च जीवनाच्या सत्ययुगासाठी ज्ञान आणि मार्गदर्शक सूचना उच्च जगातून पृथ्वीवर आणल्या.

### गुरुजी कृष्णानंद

महर्षी अमरांचे पट्टशिष्य होते. त्यांनी ऋषींचा मार्ग, सप्तर्षी ध्यानयोग विकसित केला आणि तपोनगरात सप्त ऋषींच्या आध्यात्मिक केंद्राची स्थापना केली.

### सप्तर्षी ध्यानयोग

हा लौकिक आणि आध्यात्मिक जीवन योग्य रीतीने जगण्यासाठी ऋषींनी शिकवलेला ध्यानाचा आणि भावनांना व विचारांना सकारात्मक बनविण्याचा एक अद्वितीय मार्ग आहे.

### दृढ वचन

- ★ आपण एकाच दिव्य प्रकाशाचे (परमेश्वराचे) कण आहोत.
- ★ प्रेम हा आपला स्वभाव आहे.
- ★ शांतता ही आपली भाषा आहे
- ★ ध्यान हा आपला मार्ग आहे
- ★ हे जग आपले आश्रयस्थान आहे
- ★ सर्व सृष्टीच आपलं कुटुंब आहे
- ★ परमेश्वर आपला गुरु आहे; ऋषी आपले मार्गदर्शक आहेत.

# प्रकाशमार्ग

Volume 10 Issue 2 NOVEMBER 2017 Rs. 25

## चिंतन

गुरुजी कृष्णानंद
(फेब्रुवारी १९९८ या अंकामधून, अनुवाद : जयंत देशपांडे)

प्रलय म्हणजे विनाश नव्हे. प्रलय म्हणजे जाणिवेचे उत्थान, फक्त काही लोकांच्याच जाणिवेत नव्हे तर सर्वांच्याच, सर्व जीवनाच्या जाणिवेत उत्थान. या सत्याची जाणीव सर्वत्र पसरते आहे. प्रकाश कार्यकर्त्यांना हे स्पष्ट माहीत आहे आणि जे आपल्या आध्यात्मिक प्रगतीसाठी त्यांच्या संपर्कात येतात, त्यांनाही हे समजते आहे. प्रकाश कार्यकर्ते खूप छान काम करत आहेत. ते लोकांना सूक्ष्मजग, सूक्ष्मजीव, ऊर्जा इत्यादींची आणि आपल्या जीवनात त्यांच्या भूमिकेची जाणीव तर करून देत आहेतच पण त्याशिवाय सूक्ष्मलोकांतून प्रत्यक्ष नव्या ऊर्जा आणून, त्यांचा वापर करून सकारात्मक स्पंदनांचे क्षेत्र निर्माण करत आहेत आणि या पृथ्वीवरील पुष्कळ सुप्त ऊर्जा केंद्रांना पुन्हा जागृत करत आहेत.

प्रकाश कार्य हे एकच आहे. जरी प्रकाश कार्यकर्ते वेगवेगळ्या संस्कृतीशी आणि वेगवेगळ्या धर्माशी निगडित असले तरी, ते एका वरच्या पातळीवर भेटत असतात आणि त्यांच्यामध्ये एकी आहे. सर्व कप्पे आणि प्रतिबंध फक्त मानवी पातळीवरच आहेत कारण ते मानव-निर्मित असतात.

कोणीही, प्रत्येकजण या प्रकाशकार्यात सामील होऊ शकतो. त्यासाठी कुठल्याही विशेष प्रशिक्षणाची आवश्यकता नाही. कार्यात सामील होण्यापूर्वी हे स्पष्टपणे समजणे आवश्यक आहे की, आपले सर्व जीवांवर, माणसांवर प्रेम असायला पाहिजे, ही जाणीव असायला पाहिजे की आपल्या सर्वांचा स्रोत एकच, स्वतः परमेश्वरच आहे. केव्हाही आणि कुठेही, शक्य असेल तर उत्तरेकडे किंवा पूर्वेकडे तोंड करून शांतपणे बसा आणि अशी कल्पना करा की वरून पांढरा प्रकाश आपल्यात शिरतो आहे आणि आपल्यातून सर्व पृथ्वीवर पसरून तिला शांती आणि प्रेमाने भरून टाकत आहे. हे एक साधे तंत्र आहे, ज्याचा कोणीही काही मिनिटांपासून ते काही तासांसाठी अभ्यास करू शकतो आणि या प्रकाश कार्यात सामील होऊ शकतो.

मला खूप वाटते की हे सर्व, सर्वदूर लोकांपर्यंत पोहोचवण्याची साधने माझ्याजवळ असती तर किती बरे झाले असते. असो. मला खात्री आहे की, असा प्रत्येक माणूस ज्याला कळते की ह्याचा किती मोठा प्रभाव पडेल, तो नक्कीच ह्या कार्यात सामील होईल. आणि जेव्हा जास्त लोक ह्यात सामील होतील, तेव्हा ह्याचा प्रभाव लवकर आणि जास्त पडेल.

---

जेव्हाकेव्हाही मंथन होते, तेव्हा उशीरा का होईना पण काहीतरी चांगले त्यातून बाहेर पडते. निवडणुका सुद्धा मंथनाचीच एक प्रक्रिया आहे. ही केवळ एक राजकीय प्रक्रिया नसून आध्यात्मिक प्रक्रिया सुद्धा आहे. ह्या प्रक्रियेमागे हजारो शांत लोकांचे ध्यान आणि त्यांची प्रार्थना आहे. हा एक चांगल्या भवितव्याची आशा दाखवणारा संकेत आहे.

---

लहानग्या विरालने संपूर्ण रात्र जागून "डोरवेज् टु लाईट" हे पुस्तक एका बैठकीत वाचून काढले आणि दुसऱ्या दिवशी सकाळी तो त्याबद्दल खूप उत्साही होता. पुस्तक प्रसिद्ध झाल्यानंतर पहिल्या आठवड्यातच पुष्कळ लोकांनी मला फोन करून पुस्तकाचे कौतुक केले. पुष्कळांनी मला लिहून कळवले. सर्वांनी खूप प्रेमाने आणि आपुलकीने या पुस्तकात दाखवलेल्या रुचीने माझ्या मनाला स्पर्श केला. मी कृतज्ञ आहे. हे पुस्तक अजून, बऱ्याच लोकांपर्यंत पोहोचायचे आहे, आणि मी त्यांच्या प्रतिक्रियेची वाट पाहतो आहे.

---

दिवंगत श्री एम्. पी. पंडित ह्यांच्याशी घनिष्ठ संबंध असलेले एक शांत वरिष्ठ सज्जन तपोनगरात आमच्यासोबत फक्त तीन दिवसच राहिले. त्यांना येथे चालू असलेले कार्य समजले आणि ते याबद्दल खूप गहनतेने आणि प्रेमाने बोलले, जे की येथे राहणाऱ्या लोकांनाही अद्याप समजलेले नाही. हे कार्य समजण्यासाठी, त्याला प्रेमाने हातभार लावण्यासाठी आपल्याला येथे प्रत्यक्ष राहण्याची आवश्यकता नाही. ■

मानसा फाउंडेशन (रजि.)
तपोनगर, चिक्कगुब्बि, (ऑफ हेन्नूर-बागलूर रोड) बंगलोर अर्बन ५६० ०७७. इंडिया.
फोन : (०८०) २८४६५२८०, ९९०००७५२८० (सकाळी १० ते सायं. ५ पर्यंत)
इ-मेल : info@lightagemasters.com वेबसाईट : www.lightagemasters.com

## ध्यान वर्ग

### तपोनगरात फक्त दर रविवारी भरतो

प्राथमिक पातळी – सकाळी १० वाजता

### बंगलोर शहरातील केंद्रांमधे वर्ग खालीलप्रमाणे भरतात

**दर रविवारी** (सकाळी ७ वाजता)
अंजनेय मंदिर, महालक्ष्मी लेआऊट

**दर सोमवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
अंजनेय मंदिर, महालक्ष्मी लेआऊट

**दर मंगळवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
श्री ऑरोबिंदो कॉम्प्लेक्स, फेज १,
जे.पी. नगर

**दर बुधवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
आर्य समाज, सी.एम.एच. रोड, इंदिरानगर
हिमांशु, ४ मेन, मल्लेश्वरम
मारुति मंदिर, विजयनगर

**दर गुरुवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
देवगिरी वेंकटेश्वर मंदिर, बनशंकरी स्टेज २

**दर शुक्रवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
इंडियन हॅरिटेज अकॅडमी, ब्लॉक६,
कोरामंगला

**दर शनिवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
देवगिरी वेंकटेश्वर मंदिर, बनशंकरी स्टेज २

### आनेकल येथे

**दर सोमवारी** (संध्याकाळी ६ वाजता)
सप्तर्षी ध्यान केंद्र

**दर मंगळवारी** (सकाळी ६ वाजता)
सप्तर्षी ध्यान केंद्र

**दर मंगळवारी** (सकाळी ११.३० वाजता)
श्री. मंजुनाथ शास्त्रींच्या घरी, गांधी सर्कल

बाहेरील विद्यार्थ्यांसाठी पोस्टाद्वारे किंवा ई-मेल द्वारे मार्गदर्शनाची सोय आहे. अधिक माहिती साठी पान ६ वरील पहिला कॉलम वाचावा.

**Doorways (इंग्रजीत) / तपोवाणी (कन्नड) / प्रकाशमार्ग (मराठी)
वार्षिक वर्गणी रू. ३००/–
ड्राफ्ट कृपया मानसा लाइट एज फाउंडेशन च्या नावाने काढावा.
कृपया 'मनी ऑर्डर' ने पैसे पाठवू नये.**

## वृत्तपत्र

आपल्या मित्राला भेट करावे. वर्गणी सोबत, त्यांचं नाव व पत्ता आमच्याकडे पाठवावा.



तपोनगरवासींनी नंदी हिल्सवर सहलीचा आनंद घेतला.

## काही ठळक घडामोडी

- २६–११–२०१७ रोजी तपोनगर येथे गुरुजींच्या महासमाधी दिवसानिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात येईल. ह्यात भाग घेण्यासाठी कृपया २४–११–२०१७ पर्यंत मानसा कार्यालयात आपले नाव नोंदवावे.
- २०१८ वर्षाचे मानसा कॅलेंडर देखील ह्या कार्यक्रमाप्रसंगी प्रकाशित करण्यात येईल. केवळ मागणी करणाऱ्यांसाठी मर्यादित संख्येत प्रती छापल्या जातील. तुमची प्रत राखून ठेवण्यासाठी कृपया १२–११–२०१७ पर्यंत मानसा कार्यालयात नोंद करावी.
- १४ जानेवारी २०१८ पासून शंबला गटाची नवीन बॅच सुरू होते आहे. ह्यात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी कृपया ३१ डिसेंबर २०१७ पर्यंत मानसा कार्यालयात आपले नाव नोंदवावे. बाहेरील विद्यार्थी देखील ह्यात प्रवेश घेऊ शकतील. सध्या शंबला गटात असलेल्या विद्यार्थ्यांनी देखील ३१ डिसेंबर २०१७ पर्यंत मानसा कार्यालयात त्यांचे नाव नोंदवून त्यांच्या सदस्यत्वाचे नूतनीकरण केले पाहिजे.

## गुरुजींचा महासमाधी कार्यक्रम
### २६–११–२०१७, रविवार

| | |
|---|---|
| सकाळी ११ वाजता | स्वागत |
| | वरिष्ठ साधकांचे व्याख्यान |
| | विशेष ध्यान |
| दुपारी १२.३० वाजता | प्रसाद |

## तपोनगरातील कार्यक्रम

| | | |
|---|---|---|
| दर रविवारी | – | व्याख्यान, सकाळी ११ ते १२ पर्यंत |
| | – | प्रकाश प्रवहन, मध्यान्ह १२ ते दुपारी १ पर्यंत |
| रविवार १२ | – | शंबला गटाची बैठक दुपारी २ वाजता |
| रविवार १९ | – | 'रा' गटाची बैठक दुपारी २ वाजता |
| रविवार २६ | – | गुरुजींच्या महासमाधी दिवसानिमित्त कार्यक्रम |

## ध्यानासाठी विशेष दिवस

| | | |
|---|---|---|
| ०४ | शनिवार | पौर्णिमा |
| ११ | शनिवार | कृष्णाष्टमी |
| १६ | गुरुवार | शिवरात्री |
| १८ | शनिवार | अमावास्या |
| २३ | गुरुवार | गुरुजींचा महासमाधी दिवस |
| २६ | रविवार | गुरुजींचा महासमाधी दिवस कार्यक्रम / शुक्लाष्टमी |
| २८ | मंगळवार | शुक्ल दशमी |

## आनेकल येथील कार्यक्रम

२३–११–२०१७ रोजी आपल्या सप्तर्षी ध्यान केंद्रात सकाळी ११.३० वाजता गुरुजींच्या महासमाधी दिवसानिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात येईल.

## प्रकाश प्रवहनाचे अनुभव

संकलन : वैशाली जोशी, अनुवाद : वैशाली नितिन तरे

प्रकाश प्रवहनाच्या सत्रादरम्यान मी अतिशय आनंदित होते. मला आल्हाददायी व प्रसन्न वाटत होते आणि मी खूप मनःशांती अनुभवली. रोज जेव्हाकेव्हा मी अभ्यास करण्यास बसते तेव्हा मी प्रकाशाचे प्रवहन करते. मी माझ्या अभ्यासावर पूर्णपणे लक्ष केंद्रित करू शकते. जेव्हा मी अगदी मनापासून प्रकाशाचे प्रवहन करते व परमेश्वराची प्रार्थना करते की माझ्या इच्छा पूर्ण करा, तेव्हा त्या खरोखरच पूर्ण होतात. माझी ही इच्छा आहे आणि मी त्याबद्दल शपथही घेते की प्रकाश प्रवहनाचे अनुभव सर्वत्र पसरवेन आणि इतरांना सराव करण्यासाठी विनंती करेन.

– रक्षंदा आयमन, इयत्ता दहावी, कॅनन क्राईस्ट पब्लिक स्कूल, बी. टी. एम. लेआऊट, बंगलोर

रोज सात मिनिटे प्रकाश प्रवहनाचा सराव केल्यामुळे माझे मन शांत झाले आहे. संपूर्ण जगामध्ये प्रकाश पसरवताना मला अतिशय आनंदी वाटते. माझी एकाग्रता वाढली आहे आणि माझ्या वागणूकीमध्येही सुधारणा आहे. माझ्यामध्ये आता अहंकार व मत्सर राहिला नाही.

– भूमिका एन., इयत्ता दहावी, बसवेश्वरा उच्च माध्यमिक शाळा, ब्यातरायणपुरा, बंगलोर

प्रकाश प्रवहन हे रोज माझ्यामधील एक नवीन चांगली गोष्ट बाहेर आणते, जी मला माझ्यामध्ये अधिक विकसित करायची आहे आणि माझ्या अभ्यासामध्ये तिचा उपयोग करायचा आहे. मला वाटते की माझ्या सभोवतालचा परिसर शांतीमय व स्वच्छ आहे.

– जान्हवी बी. के., इयत्ता दहावी, बसवेश्वरा उच्च माध्यमिक शाळा, ब्यातरायणपुरा, बंगलोर

प्रकाश प्रवहन हे अतिशय चांगले तंत्र आहे. विद्यार्थी खूपच शिस्तबद्ध झाले आहेत आणि त्यांची शिकण्याची क्षमता वाढली आहे. आता त्यांच्यामध्ये अधिक आत्मविश्वास आला आहे आणि ते चुका करीत नाहीत. शिक्षकांनाही प्रकाश प्रवहनाचा फायदा झाला आहे.

– श्री. कृष्णैय्या, मुख्याध्यापक, रोटरी बंगलोर विद्यालय, बंगलोर

बऱ्याच काळापासून मी प्रकाश प्रवहनाचा सराव करीत आहे. हे अतिशय सोपे तंत्र आहे. कोणीही ह्याचा सहज सराव करू शकतो आणि सर्व फायदे मिळवू शकतो. हे तंत्र वैयक्तिकपणे लोकांसाठी, एकत्रितपणे कुटुंबासाठी, गटासाठी आणि जगासाठी देखील खूपच छान आहे. ह्याचा सराव करा आणि प्रकाशमय व्हा.

– श्री. नरसिंहराजू, मुख्याध्यापक, नम्मूरा सरकारी मदारी प्राथमिक पाठशाळा, आंध्राहळ्ळी, बंगलोर

## तपोनगर डायरी

सीमा अलमेल, अनुवाद : वैशाली जोशी

गुरू हे चिरकाल असतात. ते त्यांच्या, अंतिमतः नष्ट होणाऱ्या, भौतिक रूपाने सीमांकित होऊ शकत नाहीत. एक आध्यात्मिक गुरू त्यांच्या शिकवणींच्या माध्यमातून जिवंत राहतात, ज्या त्यांच्या सर्व अनुयायांसाठी मार्गदर्शक तत्त्वे बनतात. ते त्यांच्या मूल्य प्रणालीच्या माध्यमातून जिवंत राहतात, ज्यांची ते केवळ स्थापनाच करत नाहीत तर पालन देखील करतात. परमेश्वराकडे जाणाऱ्या अवघड मार्गावर वाटचाल केल्यानंतर, गुरू हे एका आध्यात्मिक मार्गाची केवळ स्थापनाच करत नाहीत तर ते स्वतःच तो मार्ग बनतात आणि हजारो लोकांना अनुसरण करण्यासाठी प्रेरित करतात. आणि केवळ सुखद आठवणींच्या रूपातच नव्हे तर बिनशर्त प्रेम बनून देखील ते त्यांच्या विद्यार्थ्यांच्या हृदयात राहतात. त्यांनी भौतिक जग सोडून खूप काळ लोटल्यानंतर सुद्धा, त्यांचे मार्गदर्शन व संरक्षण आपल्याला जाणवत राहते. आपले गुरुजी केवळ चैतन्यमयच नाहीत, तर आत्म्याच्या स्तरावरून जे सर्व त्यांच्याकडे पाहतात, त्यांच्यासाठी ते जीवनच बनले आहेत.

तपोनगरवासींसाठी, गाडीने दीड तास प्रवासाच्या अंतरावर असलेले नंदी हिल्स, हे गुरुजींसोबत सहलीसाठी जाण्याचे आवडते स्थान होते. ऑक्टोबर महिन्यात ह्या पवित्र टेकडीवर सहल आयोजित करण्यात आली. रहिवाशांच्या समितीने ह्या सहलीचे काटेकोरपणे नियोजन करण्यासाठी कित्येक आठवडे खूप कष्ट घेऊन काम केले. प्रवास, जेवणखाण, सतरंज्या इत्यादींची सांगोपांग तरतूद करण्यात आली; ह्याचा सूपरिणाम म्हणजे सुमारे सत्तर तपोनगरवासींसाठी हा एक संस्मरणीय दिवस ठरला. जेव्हा माकडांनी आनंदावर विरजण घालण्याचा प्रयत्न केला, तेव्हा काही रहिवासी काठ्या घेऊन सभोवताली उभे राहिले व त्यांना दूर ठेवले. प्रकृतीने देखील आनंददायी, बिन पावसाचे वातावरण प्रदान केले. जरी गट मोठा होता तरी सहल यशस्वी झाली, आणि हा ह्या गोष्टीचा पुरावा होता की गुरुजी देखील त्यांचे आशीर्वाद व दिव्य उपस्थितीसह ह्यात सहभागी झाले होते. ■

## प्रकाश प्रवहनाची जागतिक चळवळ

ही आपल्या अंतःकरणाची चळवळ आहे. ह्या जगाला प्रेम व शांतीने परिपूर्ण अशी सुंदर जागा बनविण्यासाठी ही चळवळ आहे. एक अशी चळवळ जिच्यात प्रवचने नाहीत की घोषणा फलक नाहीत. एक अशी चळवळ जिच्यामध्ये प्रकाश उच्च जगातून प्रवाहित करून पृथ्वीतलावर आणणे व पसरवणे एवढेच पुरेसे आहे. प्रकाशाला प्रवाहित करा. मग शब्द जे करू शकत नाहीत ते सर्व तो प्रकाशच करेल.

आपण जेव्हा प्रकाश प्रवाहित करून पसरवतो तेव्हा तो इतरांच्या हृदयांत व घरात प्रवेश करतो आणि त्यांच्या भावना व विचारांत असलेल्या अंधःकाराला दूर करतो. त्यामुळे माणसांत परिवर्तन घडते. माणसांमधील परिवर्तनामुळे जगात परिवर्तन घडते आणि ते प्रकाशमय बनते.

हा चर्मचक्षूंना दिसणारा साधा प्रकाश नसून शक्तीच्या गाभ्यापासून येणारा अतिसूक्ष्म प्रकाश आहे. या मूलस्त्रोतातूनच सर्व सृष्टीचा जन्म झाला. ह्या प्रकाशाजवळ सर्व काही आहे: शक्ती, विवेक आणि उज्वल भविष्य. आणि तो अदृश्यपणे सर्वत्र वास करून आहे.

आपण चॅनलिंग म्हणजे प्रवहन करून ह्या प्रकाशाला पृथ्वीवर आणून सर्वत्र पसरवूया. रोज सकाळी उठल्यावर आणि रात्री निजण्यापूर्वी ७ मिनिटे आपण हे करून ह्या जगाचे परिवर्तन करूया.

ह्या जागतिक चळवळीची सुरुवात १८–०५–२००८ रोजी तारामंडळीय परिषदेने म्हणजेच सप्तर्षींनी गुरुजी कृष्णानंदांच्या मार्फत केली.

हा संदेश सर्वांपर्यंत पोहोचवा.

वेब साईट : www.lightchannels.com

## शंबला तत्त्वे

**ही प्राचीन ऋषींनी दिलेली सात तत्त्वे आहेत ज्यांचे पालन शंबला या पृथ्वीवरील प्रकाशाच्या नगरीत राहाणारे लोक करतात. हे लोक चिरतरुण असून शांती व परिपूर्णतेचे जीवन जगतात.**

१. तुमच्या अंतरंगातील प्रकाशाचा अनुभव घेऊन सभोवताली पसरवा.

२. प्रेमाचा अनुभव घ्या आणि प्रेम सर्वत्र पसरवा.

३. प्रत्येक जीवामध्ये आणि प्रत्येक वस्तूमध्ये जीवनाच्या एकात्मतेचा अनुभव घ्या.

४. दैनंदिन कामे करण्याआधी प्रथम त्यांची मनात उजळणी करा, नंतर हळू आवाजात त्यांचे शब्दांकन करा आणि नंतरच ती कृतीत उतरवा.

५. कोणतेही ध्येय पूर्ण होण्याआधी त्याविषयी कमीत कमी बोलून गुप्ततेचा नियम पाळा.

६. नकारात्मकतांशी लढा देण्यासाठी शरीर, मन आणि बुद्धीला चालना द्या.

७. उच्च आध्यात्मिक ध्येये गाठण्यासाठी स्वतःहून आपल्या लौकिक गरजांची मर्यादा ठरवा.

# गुरुजी उवाच

संकलन : शोभा राव, अनुवाद : वैशाली जोशी

ऑगस्ट २००५

आपण इथे विकास करण्यासाठी, स्वत:ला बेहत्तर करण्यासाठी, आपल्या भोवतीचे जीवन बेहत्तर बनवण्यासाठी आणि ह्या जगाला बेहत्तर बनवण्यासाठी आहोत. त्यासाठी आपण प्रगती करायला हवी. म्हणूनच आपण अनेक गोष्टी समजून घेतो, म्हणजे, आपण काय केले पाहिजे आणि आपण काय करू नये. आपण इतरांमधे दोष शोधायला नको. बहुतेक वेळा आपण तसे करतो; तशी प्रवृत्ती असते. मी असे म्हणत नाही की हे स्वाभाविक आहे, पण ही प्रवृत्ती असते. ऋषी आपल्यामधे दोष शोधत नाहीत. जेव्हा तुम्ही इतरांमधे दोष शोधता, तेव्हा तुम्ही त्यांची पारख करत असता. तुम्ही म्हणता, ''ह्या व्यक्तीने ही चूक केली आहे आणि ही योग्य गोष्ट नाही.'' आपल्याला ह्या सत्याची जाणीव होणे आवश्यक आहे, की एका विशिष्ट दृष्टिकोनातून एखादी गोष्ट चुकीची दिसू शकते. आपण जर आपल्या निरीक्षणाची पातळी उंचावर नेली तर आपल्या लक्षात येईल की तीच गोष्ट आपल्याला पूर्णपणे वेगळ्या प्रकारे दिसेल. आपण दोष काढतो कारण आपण गोष्टी आपल्या बाजूने आणि आपल्या दृष्टिकोनातून बघत असतो. आपण जीवनाकडे ऋषींच्या दृष्टिकोनातून बघण्याचा प्रयत्न करूया. मग कसला बेबनाव आणि कसले दोष? ह्या मुद्द्याचा आणखी एक घटक आहे, ''जर इतरांनी आपल्यामधे दोष शोधण्यास सुरुवात केली तर; जर ऋषींनी आपल्यामधे दोष शोधण्यास सुरुवात केली तर?'' जेव्हा आपण इतरांमधील दोष शोधणे सुरू करतो तेव्हा आपण एका विशिष्ट पातळीवर अडकून राहातो. साहजिकच आपल्यामधे त्यांच्याबद्दल नावड, अनादर विकसित होण्यास सुरुवात होते आणि असे होणे चांगले नाही. त्याने सर्वांना आपल्या छत्राखाली घेण्याच्या आपल्या प्रयत्नात आपल्याला मदत होत नाही. जेव्हा आपण विचार करतो की एखाद्या व्यक्तीने चुका केल्या आहेत, तेव्हा आपण आपल्या आणि त्याच्यामधे अंतर निर्माण करत असतो आणि त्याला आपल्या मनापासून दूर ठेवत असतो. आपण इथे संपूर्ण सृष्टीला आपल्या अंत:करणात सामावून घेण्यासाठी गोळा झालो आहोत.

---

ह्या विश्वात एक जीवन-शक्ती आहे. ऋषींनी तिला प्राणशक्ती म्हटले होते, पण आपल्याला सूर्याकडून येणाऱ्या ऊर्जांना प्राणशक्ती म्हणून ओळखण्याची सवय झाली आहे. म्हणून दोघांमधे भेद करण्यासाठी आपण या जीवन-शक्तीला महाप्राण म्हणूया. नावाने काही फरक पडत नाही. आपण याबद्दल थोडेसे समजून घेण्याचा प्रयत्न करूया.

आपण जेव्हा प्राणायामाचा सराव करतो, तेव्हा आपण अधिक प्रमाणात प्राणशक्ती आत घेतो आणि जीवन-शक्ती ही संपूर्ण वेळ आपल्या आत प्रवेश करत असते. प्राणायाम आपल्याला अधिक प्रमाणात प्राणशक्ती आत घेण्यास मदत करतो. ही प्राणशक्ती आपल्या भौतिक देहासाठी आवश्यक आहे. जीवन-शक्ती आपल्या सूक्ष्म शरीरासाठी आवश्यक आहे. भौतिक देहाला प्राणशक्तीची गरज असते; मन आणि बुद्धीला महाप्राणाची गरज असते. म्हणून प्राणायाम भौतिक देहाला मदत करतो आणि ध्यानसाधना हा महाप्राण शोषून घेण्यास मदत करते. कसे? जेव्हा आपण मन आणि बुद्धी अक्षुब्ध, शांत ठेवतो तेव्हा हा महाप्राण आपल्या आत प्रवेश करत असतो. म्हणून आपण ध्यान करतो. म्हणजे प्राणायाम भौतिक देहाला मदत करतो, आणि शांतता, जीवन-शक्ती आपल्या आत प्रवेश करण्यास मदत करते. अशा प्रकारे, जेव्हा आपण ध्यान करणे सुरू करतो तेव्हा आपले मन आणि बुद्धी सशक्त होतात. हा खूप महत्त्वाचा मुद्दा आहे.

---

भावना आणि विचार या दोन्हीमधे कोणते जास्त बळकट असते? माझी समजूत होती की विचार जास्त बळकट असतो कारण आपण विचार-शक्ती बद्दल बोलतो. पण ऋषींनी मला एके दिवशी सांगितले की हे खरे नाही. भावना ही जास्त बळकट असते. मला हे उमजले. आपण आपल्या स्वत:च्या जीवनांमधे अवलोकन करू शकतो की जेव्हा आपण अत्यंत भावनिक असतो, तेव्हा आपण तर्कबुद्धीने विचार करू शकत नाही. म्हणजे भावना विचाराला वश करते. आपण ह्या भावनांवर नियंत्रण ठेवायला हवे, ह्या भावनांचे परिष्करण करायला हवे. ह्या भावनांचे परिष्करण म्हणजे राजयोग होय. जेव्हा आपण योगाची पाठ्यपुस्तके वाचतो तेव्हा आपण राजयोगाबद्दल समजून घ्यायला हवे. हा योगाचा असा मार्ग आहे जो मनावर ताबा मिळवण्यास किंवा मनावर नियंत्रण ठेवण्यास मदत करतो. आपण याचा अर्थ सुधारू शकतो. आपण असे म्हणू शकतो की हा योगाचा असा मार्ग आहे जो मनाऐवजी प्रामुख्याने आपल्या भावनांवर ताबा मिळवण्यास मदत करतो. आपण जर आपल्या भावना परिष्कृत केल्या, तर आपण आपल्या जगण्यात सुधारणा करतो, आणि मग आपोआपच आपली इतरांबरोबरची देवाणघेवाण, जगाबरोबरची देवाणघेवाण बदलते. आपला देवाणघेवाण करण्याचा दर्जा बदलतो आणि अशा प्रकारे आपली प्रगती होते. मला खूप आनंद आहे की हे स्पष्टपणे समजले आहे.

---

२८ ऑगस्टला आम्ही एक पुस्तक प्रकाशित करत आहोत, जे प्रश्न आणि उत्तरांचे संकलन आहे. मी ते काळजीपूर्वक वाचत, तपासत होतो आणि त्यात सुधारणा करत होतो, तेव्हा माझ्या हे लक्षात आले की, ह्या उत्तरांमधे किती स्पष्टपणा, किती अंतिमत्व आहे. हे देखील माझ्या निदर्शनास आले आहे की साधारणत: जेव्हा एखादा प्रश्न विचारला जातो, तेव्हा लांबवर खुलासा करत राहाण्याची आपली प्रवृत्ती असते. केवळ उत्तर देण्याची नाही तर त्यावर टिप्पणी सुद्धा करण्याची आपली प्रवृत्ती असते. असे झाले की उत्तर खूप लांबलचक होते आणि गंमत म्हणजे कधीकधी तर ह्या समालोचनांमधे आणि स्पष्टीकरणांमधे प्रश्नाचे उत्तरच हरवते. मला आनंद आहे की इथे आम्ही ही लांबलचक स्पष्टीकरणे देण्याची प्रवृत्ती टाळली आहे. मी माझ्या गुरूंचे हे सांगणे विसरू शकत नाही, ''कुणी जर तुम्हाला वेळ विचारली तर त्याला वेळ सांगा. तुम्ही तुमचे घड्याळ बनवणाऱ्या कंपनीचे नाव इत्यादींबद्दल खुलासा करण्याची आवश्यकता नाही!'' बहुतेक वेळा घडते असे की आपण इतर गोष्टींचा खुलासा करतो आणि मुख्य मुद्दा सांगायचे विसरतो!

---

मला आनंद वाटतो की इथे गोष्टी समजून घेतल्या जातात, आणि मला जाणवते की, आठवडा ते आठवडा जरी नाही तरी महिना दर महिना अधिक समजून घेण्याचा आणि पुढे वाटचाल करत राहाण्याचा खूप प्रामाणिक उद्देश, प्रामाणिक इच्छा लोकांमधे आहे. एक तीव्र इच्छा लोकांमधे आहे, जी मला जाणवते. मला वाटते की १९८८ पासून इथे तुमच्या समोर बसून ऋषींकडून मिळालेले ज्ञान तुमच्यापर्यंत पोहोचवून माझे जीवन सार्थक झाले आहे. मला सांगावेसे वाटते की तुमच्यामुळे मी इथे आहे! नाहीतर कदाचित माझ्या आयुष्याला काहीच अर्थ राहिला नसता. ह्याने माझे हृदय भरून आले आहे, आणि मी खूप आनंदात आहे. ■

# श्री जयंत देशपांडे ह्यांच्या व्याख्यानातील उतारे

संकलन : शोभा राव; अनुवाद : सुनिता देशपांडे

१०-०९-२०१७

"होमेज टु द सन" हे पुस्तक मी सध्या वाचत आहे. ते सायप्रस येथील डस्कलस नावाच्या गुरुंबद्दल आहे. गुरुजींनी त्यांचा उल्लेख केला होता आणि त्यांच्या "द मॅगस ऑफ स्ट्रॉवलास" या पुस्तकाबद्दल आपल्याला सांगितले होते. तुमच्यापैकी पुष्कळ लोकांनी ते वाचले असेल. स्ट्रॉवलास हे जागेचे नाव आहे आणि ग्रीक भाषेत गुरुंना डस्कलस म्हणतात. "होमेज टु द सन" या पुस्तकात लिहिलेल्या काही गोष्टी मला खूप अद्भुत वाटल्या. मी त्यातील काही मुद्दे नमूद करतो.

पुस्तकात ते म्हणतात की, मानवता जसजशी प्रगत होईल, स्थूल पदार्थ किंवा गोष्टी (उदा: भिंत) आपल्यासाठी अडथळा निर्माण करू शकणार नाही. श्वास घेण्यासाठी आपल्याला ऑक्सीजनची आवश्यकता राहणार नाही. गुरुजींनी सुद्धा सांगितले होते की भविष्यात जेव्हा लोकांचे शरीर प्रकाशमय होतील, लोक जेव्हा प्रकाशशरीर धारण करतील, तेव्हा जगण्यासाठी त्यांना अन्नपाण्याची किंवा ऑक्सीजनची आवश्यकता राहणार नाही. आपण सर्वत्र असलेल्या प्रकाश आणि प्राणशक्तीवर जगू शकू.

ते महान गुरू हे पण म्हणतात की, आपण पृथ्वीच्या आतील खोल भागात आणि तसेच सूर्याच्या केंद्रात एका क्षणात पोहोचू शकू. अग्नि किंवा जल इत्यादी कोणतेच तत्त्व आपल्या प्रकाश शरीराला स्पर्श करू शकणार नाही.

आणि हे खूप रंजक आहे. त्यांचे म्हणणे आहे की, फक्त आपल्या पृथ्वीवरच नाही तर आपल्या सूर्यमालेतील प्रत्येक ग्रहावर जीवन आहे. पण ते जीवन वेगळ्या प्रकारचे आहे. कदाचित तेथील लोकांच्या स्पंदनांची कंपनसंख्या वेगळी आहे, म्हणून ते आपल्याला दिसत नाहीत. तेथे महान आध्यात्मिक गुरू आहेत जे कदाचित सूक्ष्म पातळीवर आपले मार्गदर्शन करतात. आणि ते कधीकधी मानवरूपात इथे जन्म घेतात व लोकांचे मार्गदर्शन करतात. गुरुजींनी सुद्धा सांगितले होते की, ग्रहांवरील आत्मे या पृथ्वीवर, येथील जीवन अनुभवण्यासाठी जन्म घेत असतात.

या पुस्तकात तर गुरू डस्कलस सूक्ष्मदेहाने प्रवासाबद्दल पण बोलले आहेत. ते या प्रवासाला "एक्झामॅटोसिस" म्हणतात. ते म्हणतात की आपल्या पृथ्वीवरील जीवनाच्या विकासाची देखरेख उच्च लोकांतील जीव करत असतात. या गुरूंनी पुस्तकात जे सांगितले आहे आणि आपल्या गुरुजींनी जे आपल्याला सांगितले आहे, त्यांत अशा पुष्कळ एकसारख्या गोष्टी मला आढळल्या. ते म्हणतात की कोणत्याही गोष्टीची निवड करण्याचे स्वातंत्र्य आपल्याजवळ असायला पाहिजे. चांगल्या गोष्टी सुद्धा कोणावर लादायला नको.

पुस्तकात या महान गुरुंच्या अद्भुत त्वरित हीलिंग करण्याच्या घटनांचा उल्लेख आहे. त्यांनी लोकांना क्षणात बरे केले आहे. पण ते कर्म आणि चक्रांबद्दल सुद्धा बोलतात. पुस्तकात त्यांनी हे सुद्धा सांगितले आहे की, काही वेळा बरे करणे कठीण होऊन जाते, किंवा त्याला वेळ लागतो, जेव्हा लोक त्यांच्यामधे अपेक्षित बदल घडू देत नाहीत. आणि त्यांनी हे सुद्धा म्हटले आहे की, शेवटी खरंतर कृपेमुळेच लोक बरे होतात. इथे गुरुजींकडून आपल्याला हे समजले आहे की, आपल्यामधे पूर्ण बदल जरी झाला नाही, आणि बदल होण्यास फक्त सुरुवात जरी झाली तर परमेश्वराची कृपा मिळवण्यासाठी आणि हीलिंग प्रक्रियेला सुरुवात होण्यासाठी तेवढे पुरेसे असते.

गुरू डस्कलस हे "एलिमेंटल्स" बद्दल खूप विस्ताराने बोलले. आपले पुस्तक "न्यू एज रिऍलिटीज्" या पुस्तकातून मी "एलिमेंटल्स" बद्दल काही माहिती इथे नमूद करण्यासाठी गोळा केली आहे. तुम्ही सुद्धा हे वाचून जास्त समजून घेऊ शकता. त्यांच्या पुस्तकात गुरू डस्कलस हे हीलिंगसाठी, सुरक्षेसाठी आणि इतरांना मदत करण्यासाठी जाणीवपूर्वक "एलिमेंटल्स"चे निर्माण करण्याबद्दल बोलतात. आपल्याकडे इथे आपण तसे करत नाही. आपण हीलिंग वेगळ्या पद्धतीने करतो. गुरुजी आपल्याला सांगत असत की जेव्हा आपण हीलिंग ऊर्जा पाठवतो, तेव्हा आपण, ती व्यक्ती बरी होते आहे अशी दृढ इच्छा मनात ठेवायला पाहिजे, असा शुद्ध हेतु मनात ठेवून हीलिंग ऊर्जा पाठवायला हव्यात. असा दृढ विचार आणि बरे करण्याचा शुद्ध हेतु, ह्यांचे एक ऊर्जा क्षेत्र तयार होत असते, जे हीलिंग ऊर्जांसोबत त्या व्यक्तीपर्यंत पोहोचते आणि तिला बरे करण्यात मदत करते.

"एलिमेंटल" हे एक असे ऊर्जा क्षेत्र आहे, जे स्पष्ट हेतुने बाळगलेल्या एका बळकट विचारामुळे किंवा भावनेमुळे जन्माला येत असते. गुरुजींनी समजावून सांगितले होते की, "एलिमेंटल"ची स्वतःची प्रज्ञा असते, एकप्रकारची वैयक्तिकता असते; त्याला इच्छा-स्वातंत्र्य सुद्धा असते.

पुस्तकात गुरू डस्कलस हे इतरांचे रक्षण करण्यासाठी "एलिमेंटल"च्या निर्माणाबद्दल बोलतात. हे एक सुरक्षाकवच बनवण्यासारखे आहे. या दोन्ही गोष्टी जरी एकच नसल्या तरी त्यांच्यामध्ये साम्य आहे. आणि त्यांनी म्हटले आहे की जर ती व्यक्ती खूप नकारात्मक असेल, बदलायला तयार नसेल, ती जर नव्या ऊर्जांचा स्वीकार करण्यासाठी तयार नसेल, तर तिचे संरक्षण करण्यासाठी तयार केलेले "एलिमेंटल" उपयोगी ठरणार नाही. ते नष्ट होईल. इथे सुद्धा आपल्याला माहीत आहे की, आपण जर नकारात्मक विचार बाळगले, तर आपल्या सुरक्षाकवचाला छिद्र पडतील आणि ते निकामी ठरेल.

गुरुजींनी सांगितले होते की, जेव्हा आपण सतत नकारात्मक विचार करत असतो आणि इतरांसाठी नकारात्मक हेतु मनात बाळगतो, तेव्हा "एलिमेंटल्स" निर्माण होतात. असे सकारात्मक विचारांसाठी सुद्धा घडते. जर कोणाला नुकसान पोहोचवण्यासाठी एखादे नकारात्मक "एलिमेंटल" पाठवण्यात आले, तर व्यक्तीचे नुकसान करायचे किंवा नाही, ते, त्या "एलिमेंटल"ची स्वतःची प्रज्ञा ठरवते. जर एखादी व्यक्ती खूप पवित्र आणि सकारात्मक असेल, तर "एलिमेंटल" ती गोष्ट जाणू शकेल आणि मग ते त्या व्यक्तीत प्रवेश करणार नाही. हे किती अद्भुत आहे! उलटपक्षी ते विश्वाकडून ऊर्जा गोळा करून आणखी बळकट बनेल आणि त्या माणसाकडे परत जाईल, ज्याने त्याचे निर्माण केले असेल. आणि दुसऱ्या माणसासाठी जितक्या नुकसानाची त्याने इच्छा केली होती, त्यापेक्षा जास्त नुकसान ते त्याला पोहोचवेल! आपण गुरुजींकडून ऐकले आहे की, जे विचार आणि भावना आपण आपल्यातून बाहेर विश्वाकडे पाठवतो, त्याच्या कितीतरी पटीने आपल्याला ते परत मिळतात. आपण ह्याचा अनुभव घेऊ शकतो. आपण फक्त सकारात्मक विचारच करायचा असा मनात दृढ निश्चय करून, आणि त्याप्रमाणे जगून पाहू शकतो की लोक आपल्याला कसा प्रतिसाद देतात, कसे अनुभव आपल्याला मिळतात. मला खात्री आहे की, आपल्याला असे अनुभव येतील की ज्यामुळे आपण नेहमीसाठी सकारात्मक राहण्यासाठी प्रेरित होऊ. गुरुजी हे ही सांगत असत की आपला स्वतःचा चांगुलपणा, आपली शुद्धता आपल्याभोवती सुरक्षाकवच निर्माण करते. हे कवच नकारात्मक ऊर्जा आणि "एलिमेंटल्स"पासून आणि इतर नकारात्मक गोष्टींपासून आपले रक्षण करते.

एखादे एलिमेंटल जर आपल्याकडे आले तर त्याबद्दल आपल्याला कळणार देखील नाही पण महान गुरूंकडे जर कोणी असे एलिमेंटल पाठवले तर त्याबद्दल त्यांना कळते. ते त्या एलिमेंटलला शोषून घेतात, कारण एलिमेंटल पाठवणाऱ्या माणसाला त्यापासून नुकसान किंवा इजा व्हावी अशी त्यांची इच्छा नसते. इतके असीम प्रेम ते बाळगत असतात. त्या एलिमेंटलला शोषून घेतल्यामुळे काही काळासाठी आजारपण किंवा त्रास त्यांना सहन करावा लागतो. आणि ज्या व्यक्तीने ते पाठवले असते त्याला त्रास होत नाही पण गुरूंना इजा करण्याच्या हेतुमुळे तो कर्म गोळा करत असतो. त्याच्यापासून त्याची सुटका होऊ शकत नाही.

आपल्या पुस्तकात अशी पुष्कळ माहिती आहे आणि या महान गुरूंच्या पुस्तकांमधे सुद्धा आहे. आपण दोन्ही पुस्तके वाचून जास्त समजून घेऊ शकतो. ■

## बाहेरील विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन

जे प्रत्यक्षात ध्यान वर्गात येऊ शकत नाहीत, त्यांच्यासाठी पोस्टाद्वारे किंवा ई–मेल द्वारे मार्गदर्शनाची सोय आहे. इंग्रजीतून मार्गदर्शनासाठी नोंदणी शुल्क २५०० रू. व कन्नड, मराठी आणि हिंदीतून मार्गदर्शनासाठी १३०० रू. आहे. भारताबाहेर राहाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी नोंदणी शुल्क ४५०० रू. आहे. ह्या शुल्कात मासिकासाठी वार्षिक वर्गणी आणि पाठ्यपुस्तकांची किंमत समाविष्ट आहे.

त्यानंतर, वार्षिक नूतनीकरण शुल्क, इंग्रजीतून मार्गदर्शनासाठी २००० रू. व कन्नड, मराठी आणि हिंदीतून मार्गदर्शनासाठी ९०० रू. आहे. भारताबाहेर राहाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वार्षिक नूतनीकरण शुल्क ३५०० रू. आहे. ह्या शुल्कात मासिकासाठी वार्षिक वर्गणी समाविष्ट आहे.

- ★ सर्व सूचना पोस्टाद्वारे किंवा इ–मेल द्वारे (विद्यार्थ्यांनी निवडल्याप्रमाणे) नियमित पाठवण्यात येतात.
- ★ ऋषी स्वतः सूक्ष्मदेहाने दीक्षा देतात. आपल्या प्रगतीचे निरीक्षण सुद्धा ते सूक्ष्मदेहाने करतात.
- ★ सगळ्या शंका व प्रश्नांची उत्तरं श्री. जयंत देशपांडे देतात.
- ★ मार्ग आणि साधना नीट समजून घेण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांनी आमच्या पाठ्यपुस्तकांचा आणि आमच्या इतर प्रकाशनांचा सखोल अभ्यास करावा.
- ★ साधनेचा अहवाल आम्ही सांगितलेल्या पद्धतीने वेळेवर पाठवावा. अहवाल जर वेळेवर मिळाला नाही तर विद्यार्थ्याने ध्यान करण्याचे थांबवले आहे असे समजले जाईल.

चेक/ड्राफ्ट "Manasa Light Age Foundation Bangalore" च्या नावाने काढावा.

## गुरुजींकडून विशेष सूचना

- ★ विद्यार्थ्यांनी धैर्य ठेवावे. पहिल्याच दिवशी समाधीचा अनुभव होईल, अशी अपेक्षा ठेवू नये! चमत्कारांची अपेक्षा ठेवू नये. जेव्हा आपण प्रामाणिकपणे साधना करतो तेव्हा शांतपणे चमत्कार घडतात, हे सुद्धा मात्र तेवढेच खरे आहे.
- ★ प्रत्येकासाठी अडथळे वेगवेगळे असतात. सतत अभ्यासाने अडथळे नाहीसे होतात.
- ★ प्रत्येकाचेच अनुभव खास असतात. तरी त्यांना खूप महत्त्व देऊ नये. ध्यान करतांना झालेले हे अनुभव छान असतात पण ते आपल्या आध्यात्मिक प्रगतीचे प्रमाण दाखवीत नसतात.
- ★ ध्यान करतांना कार्यान्वित झालेल्या प्रक्रियांचे विश्लेषण करू नये. तसे केल्याने स्तब्धता किंवा शांतता प्रस्थापित करता येत नाही.
- ★ ध्यान करतांना विचारांची गर्दी ही सर्वांचीच समस्या आहे. त्याबद्दल काळजी करू नये. विचारांना दूर करण्याचा प्रयत्न सुद्धा करू नये. फक्त त्यांच्याकडे दुर्लक्ष करावे. दुसरा कुठलाच उपाय नाही.

## एक आशा

कार्तिक एन., अनुवाद : वैशाली जोशी

आपल्यातील प्रत्येकाची जीवनात उच्च ध्येये आहेत; अशी ध्येये ज्यांचा उद्देश आपला उद्धार करणे आहे. आपण सुरुवात नेहमी प्रामाणिकपणाने आणि उत्कटतेने करतो. उत्साह आणि आशा आपल्या प्रयत्नांमध्ये तीव्रता आणतात. आपल्या ध्येयांच्या दिशेने प्रवास सुरू असताना, कित्येक अवघड परिस्थितींशी आपला सामना होत असतो, ज्या आपले प्रयत्न विफल करू शकतात. आपली इच्छा–शक्ती जर दुर्बल असली तर बाह्य घटक आपल्याला गोंधळात पाडू शकतात. आपली प्रगती मंद गतीने आणि अपेक्षांप्रमाणे न होत असल्यामुळे आपल्याला वैफल्य येते. हळूहळू आपली ध्येयावरील श्रद्धा डळमळते. आणि आपला संघर्ष सुरू होतो.

कौटुंबिक, सामाजिक आणि राष्ट्रीय स्तरावर आपली अशी उच्च उद्दिष्टे असतात. हा असा काळ आहे जेव्हा आपण सर्व पातळ्यांवर खळबळ माजलेली पाहात आहोत. एकंदर मानवताच कठीण काळातून जात आहे. कित्येक जण असहायता अनुभवत आहेत. आपण जर ह्याच्या पलीकडे गेलो नाही, जर आपण दीर्घकाळ संघर्ष करत राहिलो, तर उच्च टप्प्यांवर पोहोचण्याची आपली मूळ इच्छा कमी होते. आशा क्षीण होते.

जीवनातील प्रत्येक अशा टप्प्यावर, जे कोणी आध्यात्मिकतेकडे वळले आहेत त्यांची कधीही निराशा झालेली नाही. जेव्हा आपण आपली ध्येये विस्तारित करतो आणि त्यांना सत्य व प्रेमावर आधारतो तेव्हा विश्व नेहमीच मदत करते. गुरुजी एक महान गुरू आहेत ज्यांच्या माध्यमातून आपण परमेश्वराची कार्यपद्धती बघितली आहे. त्यांनी ऋषींकडून मिळालेले अविपर्यस्त ज्ञान देऊन आपले मार्गदर्शन केले. त्यांनी त्या ज्ञानासोबत उच्च ऊर्जा आणि प्रेम आपल्याला दिले. प्रत्येक वेळी, त्यांनी आपल्यात नवीन आशेची आणि जीवन–शक्तीची भर घातली. ह्याने आपल्याला नव्या दृष्टिकोनातून पाहाण्यास आणि आपला प्रवास नव्या जोमाने आणि स्पष्टतेने चालू ठेवण्यास सक्षम केले.

ह्या गोंधळाच्या आणि संघर्षांच्या काळात, गुरुजींनी ऋषींकडून आणलेल्या ज्ञानाच्या भांडाराद्वारे मानवजातीचे मार्गदर्शन करणे चालू ठेवले आहे. त्यांनी सूक्ष्म पातळ्यांवरून अधिक कार्य करणे चालू ठेवले आहे. ह्या आव्हानात्मक काळादरम्यान ते आशा देण्याचे कार्य करत आहेत. आशा, जी आपल्याला उच्च जीवनाच्या दिशेने प्रवास करण्यास मदत करते; आशा, जी आपल्याला सुवर्ण युग स्थापित करण्यात मदत करते. ■

## उद्दिष्ट वास्तव निर्माण करते

हेमलता प्रमोद, अनुवाद : वैशाली जोशी

गुरुजी आपल्या सर्वांप्रमाणे जगले – त्यांनी सरकारी कार्यालयात काम केले, त्यांचे कुटुंब पण होते आणि त्यांना इतर अनेक जबाबदाऱ्याही होत्या. जेव्हा ऋषीकार्यासाठी हाक आली तेव्हा त्यांच्याकडे जे काही होते ते सर्व सोडून ते बाहेर पडले. त्यांना खूप मानहानी सहन करावी लागली. त्यांचे धैर्य, खंबीरपणा, निर्धार आणि त्यापेक्षा महत्त्वाचे म्हणजे त्यांच्या परमेश्वर आणि ऋषींवरील अढळ श्रद्धेने त्यांना त्या कठीण टप्प्यातून बाहेर पडण्यात मदत केली.

त्यांनी "वैश्विक मनोरा" व इतर इमारती बांधण्याचे स्वप्न पाहण्याचे धाडस अशा वेळी केले जेव्हा त्यांच्याकडे साध्या पोटापाण्यासाठी देखील पुरेसा पैसा नव्हता. त्यांच्या गुरूंचे स्वप्न साकार करण्याचा, म्हणजेच, ऋषींचे हे केंद्र विकसित करण्याचा आणि तपोनगराला दुसरे शंबला बनविण्याचा त्यांचा मजबूत इरादा आणि वचनबद्धता असल्यामुळे हे शक्य झाले. त्यांनी मनोदय केला आणि त्यानंतर त्यांच्या ध्येयाच्या दिशेने अत्यंत सबुरीने आणि चिकाटीने आणि "कधीही हार मानायची नाही" ही वृत्ती बाळगून लहान पण खात्रीशीर पाऊले उचलली. "प्रकाशवाट" हे पुस्तक फक्त अमराजी आणि गुरुजींच्या जीवनाबाबत नाही, तर ते ह्या गोष्टीचा पुरावा आहे की त्यांनी जे काही शिकवले ते सर्व ते जगले.

गुरुजी पुष्कळदा म्हणायचे, "फक्त इच्छा करा, ते पुरेसे आहे." ते हे सुद्धा म्हणाले की आपल्यापैकी बहुसंख्य लोकांनी जर प्रबळ इच्छा केली की सत्य युगाचा जन्म व्हावा, तर ते घडेल. "इच्छे" मधे जर एवढे सामर्थ्य असेल, तर तपोनगराला दुसरे शंबला बनवण्याच्या त्यांच्या इच्छेला बळ देणे आपणा सर्वांसाठी शक्य नाही का? आपण इच्छा करू शकतो आणि त्यानंतर आपले अग्रक्रम पुनर्संघटित करणे आणि स्वत:ला कार्यासाठी पुन:समर्पित करणे आणि महान गुरू आणि ऋषींचे अनुसरण करणे यांसारखी लहान पाऊले आपण उचलू शकतो. डॉ. वेन डायर, त्यांचे पुस्तक "Real Magic" यात म्हणतात, "माझे उद्दिष्ट माझे वास्तव निर्माण करते" याचे दैनंदिन जीवनात पुष्टीकरण करा. आपण आपली स्वप्ने व आपल्या महान गुरूंची स्वप्ने पूर्ण करण्यासाठी ह्याचा प्रयोग करू शकतो. मला वाटते की गुरुजींच्या महासमाधीच्या दिवशी ही त्यांना सर्वोत्तम भेट असेल. ■

# प्रश्नोत्तरे

संकलन : शोभा राव, अनुवाद : सुनिता देशपांडे

**प्र: पिरॅमिडच्या वरती आणि खाली सूक्ष्मरूपात तयार होणाऱ्या उलट्या पिरॅमिड्स मागे काय उद्देश असतो?**

उ: ऋषींनी हे स्पष्ट केले की जेव्हा एखादे पिरॅमिड बांधले जाते तेव्हा त्या भौतिक पिरॅमिडच्या वर आणि खाली उलटे पिरॅमिड सूक्ष्मपातळीवर अस्तित्वात येत असते. आपल्याला त्यांच्या उद्देशाविषयी फार थोडी माहिती आहे. वेगवेगळ्या लोकांतून ऊर्जा संपादन करण्याकरिता त्यांचा उपयोग केला जातो. हे पिरॅमिड दैवी आणि भौतिक विश्वांचे प्रतिनिधित्व करतात. पहिल्या किंवा वरच्या उलट्या पिरॅमिडमधे चार दैवी लोकांमधील ऊर्जा गोळाकरून साठवलेल्या असतात. खालच्या उलट्या पिरॅमिडमधे पाताळ लोकांमधील ऊर्जा गोळा करून साठवलेल्या असतात. आपल्याला या पाताळजगांविषयी असलेल्या आपल्या समजुती सुधाराव्या लागतील.

**प्र: मेक्सिकोमधील पिरॅमिडस् केव्हा बांधण्यात आले?**

उ: त्यांचे निर्माण हजारो वर्षांपूर्वी मायन संस्कृतीच्या लोकांनी केले होते. सूर्याच्या आत भलेमोठे आकाश आणि खूप पृथ्व्या आहेत. या पृथ्व्यांवर राहणाऱ्या बऱ्याच लोकांना, प्रगत आत्म्यांना सीरिअस या ताऱ्याकडून प्रचंड ज्ञान आणि ऊर्जा मिळाल्या. पिरॅमिड्स बद्दल ज्ञान हे सीरिअस ताऱ्यातून आले आहे. तेथील आत्म्यांनी मायन संस्कृतीत जन्म घेतला तेव्हा त्यांनी पिरॅमिडस्‌चे निर्माण केले आणि मग नंतर ते सूर्यामधे परत गेले.

**प्र: स्थित्यंतराचे कार्य किती प्रमाणात ऋषी आणि किती प्रमाणात अवतार करत असतात?**

उ: सर्व कार्य अवतारांच्या देखरेखीत होत आहे आणि पुढे सुद्धा होईल. अवतार स्वतः सर्व कार्य करत नाहीत. त्याची आवश्यकता नाही. परंतु काही अत्यंत महत्त्वपूर्ण कार्य अवतार स्वतःच करत असतात.

**प्र: नैसर्गिक आपत्त्यांदरम्यान कोणत्या ऊर्जा प्रसारित होतात?**

उ: नैसर्गिक आपत्त्यांदरम्यान, विनाशाच्या आणि तसेच निर्मितीच्या आणि शुद्धीकरणाच्या सुद्धा ऊर्जा प्रसारित होतात. या ऊर्जा लोकांना शुद्ध आणि स्वच्छ करतात. आणखीही काही प्रकारच्या ऊर्जा प्रसारित होतात. ऋषींना या सर्व गोष्टी माहीत आहेत. म्हणून जेव्हा जेव्हा नैसर्गिक आपत्ती येते तेव्हा ते त्यांच्या मार्गाने पीडित लोकांना मदत करतात. ते, या असामान्य ऊर्जा गोळा सुद्धा करतात आणि योग्यवेळी वापर करण्यासाठी त्यांचा साठा सुद्धा करत असतात.

**प्र: आपल्या जीवनातील गोंधळ हा आपल्याला बदलण्याकरिता पुरेसा असतो का?**

उ: नाही, तो पुरेसा नसतो. ती एक संधी असते. आपण त्याचा उपयोग करून प्रगती करायला हवी. आपल्याला हे समजून घ्यावे लागेल की आपल्या आत खळबळ का आहे. आपल्याला विश्लेषण करून समजून घ्यावे लागेल आणि मग प्रयत्न करून प्रगती करावी लागेल. गोंधळाचे कारण समजणे फार आवश्यक आहे. त्याचे मूळ कारण आपण शोधायला हवे. ते आपल्याला समजले की त्यापासून आपण धडा घेऊ शकतो. आपण जर का गोंधळाला आपल्या जीवनाचा ताबा घेऊ दिला तर आपल्याला खूप कष्टांमधून जावे लागेल.

**प्र: जर एखाद्या व्यक्तीला परत जन्म घ्यायचा नसेल आणि त्याविषयी जर त्याची इच्छा दृढ असेल तर मग काय होते?**

उ: त्याच्या सर्व कर्मांचा नाश होईपर्यंत त्याला जन्म घ्यावा लागतो. इच्छा महत्त्वाची असते. दृढ इच्छा असणे आवश्यक आहे पण त्या इच्छेमागे एक चांगला उद्देश असणे पण आवश्यक असते.

**प्र: आपल्याला जर परत जन्म घ्यायची इच्छा नसेल तर आपल्याला याच जन्मात सर्व कर्मांचा नाश करावा लागतो का?**

उ: होय.

**प्र: नकारात्मक व्यक्तींकडे जर का आपण प्रकाशाचे प्रवहन केले तर प्रकाश त्यांच्यात शिरेल का?**

उ: व्यक्ती नकारात्मक असो किंवा सकारात्मक, जोपर्यंत ती प्रकाशाला स्वीकारायला तयार नसते तोपर्यंत प्रकाश तिच्यात प्रवेश करत नाही. प्रकाशाकडे प्रज्ञा असते आणि तो व्यक्तीच्या इच्छास्वातंत्र्याचा आदर करत असतो. ■

## आमची प्रकाशने

| | |
|---|---|
| Doorways to Light | 200/- |
| New Age Realities | 200/- |
| Higher Communication & Other Realities | 100/- |
| Light Body & Other Realities | 100/- |
| Master-Pupil Talks | 60/- |
| Master-Pupil Talks - Vol 2 | 75/- |
| iGuruji Vol 1,3,4 & 7 | each 150/- |
| iGuruji - Vol 2 | 120/- |
| iGuruji - Vol 5 | 100/- |
| iGuruji - Vol 6 | 75/- |
| Living in the Light of My Guru | 220/- |
| How to Meditate | 50/- |
| Dhyana Yoga | 50/- |
| Descent of Soul | 50/- |
| Practising Shambala Principles | 50/- |
| Astral Ventures of A Modern Rishi | 50/- |
| Channelled Knowledge from the Rishis-Vol 2 | 150/- |
| Channelled Knowledge from the Rishis-Vol 3 & 4 | each 200/- |
| Guruji Speaks Part - I & II | each 200/- |
| Guruji Speaks (Vol 3) | 150/- |
| Guruji Speaks (Vol 4) | 250/- |
| Guruji Speaks (Vol 5 & 7) | each 200/- |
| The Book of Reflections - Vol 1 & 2 | each 200/- |
| The Book of Reflections - Vol 3 | 150/- |
| Meditators on Meditations | 75/- |
| Meditators on Experiences | 75/- |
| Meditational Experiences - Vol 1 & 2 | each 150/- |
| Awareness | 60/- |
| Living in Light | 10/- |
| Light | 10/- |
| Quotes from the Rishis - Vol 1 & 2 | each 100/- |
| Pyramid Revelations | 100/- |
| Thus Spoke Guruji Krishnananda - Vol 1 | 200/- |
| Thus Spoke Guruji Krishnananda - Vol 2 | 250/- |
| प्रकाशवाट (Marathi) | 150/- |
| आय्‌गुरूजी (Marathi) | 100/- |
| ध्यान कसे करावे (Marathi) | 50/- |
| ध्यानयोग (Marathi) | 50/- |
| आत्म्याचे पृथ्वीवर अवतरण (Marathi) | 50/- |
| शंबला तत्त्वांचा अभ्यास (Marathi) | 50/- |
| एका आधुनिक ऋषीचे सूक्ष्मजगातील पराक्रम (Marathi) | 50/- |
| प्रकाशमय जीवन (Marathi) | 10/- |
| प्रकाश (Marathi) | 10/- |
| उच्चस्तरीय संवाद आणि इतर सत्ये (Marathi) | 100/- |
| गुरु–शिष्य संवाद (Marathi) | 60/- |
| ध्यान कैसे करे (Hindi) | 50/- |
| ध्यान-योग (Hindi) | 50/- |
| प्रकाश (Hindi) | 10/- |
| प्रकाशमय जीवन (Hindi) | 10/- |
| प्रकाश की ओर (Hindi) | 150/- |
| आत्मा का अवतरण (Hindi) | 50/- |

### ही पुस्तके खालील ठिकाणी मिळतील:

**मुंबई:** चेतना बुक सेन्टर, फोर्ट (फोन:२२८५१२४३)

मेजस्टिक एजन्सीज, विले पार्ले (पू) (फोन: २६१३२८७९)

गिरि ट्रेडिंग एजन्सी, डोंबिवलि (पू) (फोन: ०२५१–२८६–१८९०/२४४–९५८५)

गिरि ट्रेडिंग एजन्सी, गोरेगाव (प) (फोन: २८७६७२९८)

गिरि ट्रेडिंग एजन्सी, माटुंगा (फोन: २४१२२३१६, २४१४१३४४)

गिरि ट्रेडिंग एजन्सी, नवी मुंबई (फोन:३२५२२४९१)

**पुणे:** संस्कृती प्रकाशन, आप्पा बळवंत चौक (फोन: २४४९७३४३)

द इंटरनॅशनल बुक सर्विस, डेक्कन जिमखाना (फोन: २५६७७४०५)


द वर्ड बुक शॉप, कँप (फोन: २६१३३११८, ३०५८००१०/११, ९३७०६७८११३/४)

उज्वल ग्रंथ भंडार, आप्पा बळवंत चौक (फोन: २४४५६९०८, ६५२२६१३७)

यशवंत प्रकाशन, सदाशिव पेठ (फोन:२४४७०५३३)

**नागपुर:** दिलीप बुक एजन्सी, मेडिकल चौक (फोन: ६५९५०३२)

Published: 21st of Every Month. RNI. No. KARMAR/2008/27314 Regd. Postal Regn. No. KARN/BGE/1125/ 2017-2019
Date of posting Newsletter-25th or 27th or 29th of Every Month. Posted at Bangalore PSO, Bg-560026 No. of Pages-8



गुरुजी कृष्णानंद (१९३९ – २०१२)

### मानसा फाउंडेशन (रजि)

प्रकाशाच्या कार्याशी निगडित आहे आणि तपोनगरात आणि बंगलोर शहरात ध्यानवर्ग चालवण्याचे कार्य करते. गुरुजी कृष्णानंदांनी १९८८ मधे ह्या संस्थेची स्थापना केली.

### मानसा

बंगलोर पासून २० कि.मी. अंतरावर आहे. ही ध्यान करणाऱ्यांची एक उमलती जागा आहे. महर्षी अमरांना १९३५ साली इथे ऋषींच्या कार्यासंबंधी आणि प्रकाशाच्या एका आगामी शहराबद्दल साक्षात्कार झाला होता.

इथे कॉस्मिक टॉवर, कुंडलिनी मंदिर आणि तपोवन या ध्यान करण्यासाठी विशिष्ट जागा आहेत.

इथे ''मानसी'' नावाचे एक विशेष शक्तीक्षेत्र तपोनगराच्या सभोवताली ऋषींनी प्रस्थापित केले आहे आणि विशेष शक्ती इथे गोळा करून ठेवल्या आहेत.

### अंतरमानसा

मानसाचे जन्मस्थान, तपोनगरच्या १ कि.मी. पलीकडे, नाडगौडा गोलाहल्ली नावाच्या गावात आहे. इथे एक झोपडी आणि इतर अशा जागा आहेत ज्यांच्यात गुरुजी १९८७ ते १९९२ पर्यंत राहिले होते.

### स्टडी सेंटर

हे अंतरमानसा येथे, ऋषींच्या मार्गदर्शनाखाली आध्यात्मिक सत्यांच्या अभ्यासासाठी असलेले, एक विशेष केंद्र आहे.

### ज्योती प्रॉजेक्ट

मुख्यत्वेकरून गावातल्या मुलांसाठी आहे. मुलांना शाळेतल्या त्यांच्या अभ्यासात मदत केली जाते आणि त्यांना श्लोक, भजन, स्वच्छता, सामान्य ज्ञान आणि कंप्यूटरचे प्रशिक्षण दिले जाते. ड्राइंग, पेंटिंग आणि गोष्टी सांगण्याच्या कलेतून व्यक्त करण्यासाठी, त्यांना प्रोत्साहित केले जाते.

### भेट देणाऱ्यांसाठी

दररोज सकाळी १० ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत सर्वांना ध्यानासाठी परवानगी आहे

### अपील

कृपया आमच्या सेवेस मदत करावी. चेक/ड्राफ्ट मानसा फाउंडेशनच्या नावाने काढावा. ८०–जी अंतर्गत आयकरात सूट मिळेल.

## आध्यात्मिक अनुभव

संकलन : शोभा राव, अनुवाद : गुरुराज कानाडे

ध्यान करताना मी नेहमी कल्पना करते की, मी अतिशय छान सहलींवर जात आहे, कारण माझी प्रकृती बरी नसल्याने गेल्या काही वर्षात मी प्रवास करू शकलेले नाही. आम्हाला गूगल कंपनीतून फोन आला आणि त्यांनी आम्हाला सांगितले की आम्ही 'प्रॉगची सफर' जिंकली आहे! हे बक्षीस माझ्या पतीच्या कंपनीस मिळाले आहे! त्यात आम्हा दोघांचा विमानाने जाण्या येण्याचा खर्च व प्रॉग येथे हॉटेलमध्ये राहण्याचा खर्च समाविष्ट आहे. आम्ही लवकरच ह्या सहलीस निघू. ही घटना म्हणजे जणू काही माझे स्वप्नच साकारत असल्यासारखे आहे. आणि माझा हा दृढ विश्वास आहे की माझ्या ध्यानसाधनेची ह्यात नक्कीच मदत झाली आहे.

आता जीवन जास्त अर्थपूर्ण झाले आहे – ध्यानसाधनेने मला निश्चित ध्येय व दिशा दिली आहे. माझ्या अंतरंगात गहन शांती नांदते आहे, जी दैनंदिन घटनांच्या प्रभावाने विचलित होत नाही. कोणत्याही गोष्टीचे मला ओझे वाटत नाही, उलट आव्हानांना मी अगदी खंबीरपणे तोंड देते. गुरुजी व ऋषींशी मी नेहमी जोडलेले आहे, असे मला जाणवते. ते सतत आपले मार्गदर्शन करीत आहेत, आपली मदत करत आहेत. माझ्यात त्यांच्याप्रती कृतज्ञता व प्रेम आहे. जीवनात बरीचशी आव्हाने असूनही मी नेहमी सकारात्मक असते!

– पायल वर्मा

ध्यान करीत असताना मला वाटते की प्रत्येक चक्र जागृत झाले आहे आणि त्याची ऊर्जा उत्सर्जित करीत आहे. ही ऊर्जा मी माझ्या शरीरात अनुभवते. चक्रांची प्रत्येक पाकळी उघडून त्यातून ऊर्जा बाहेर पडत असल्याचे मला जाणवते.

बऱ्याचदा मला माझ्या घरात ऋषींची उपस्थिती जाणवते. माझ्या जीवनाचा कायापालट झाला आहे.

– स्वप्ना टेंबे

माझ्या पाळीव कुत्र्याला, 'जिमी'ला एका किचकट शस्त्रक्रियेतून जावे लागले. शस्त्रक्रिया सुरू होण्यापूर्वी मी त्याला, डॉक्टरांना, शस्त्रक्रियेसाठी वापरण्यात येणाऱ्या उपकरणांना प्रकाश पाठवला व ऋषींना प्रार्थना केली. शस्त्रक्रिया अगदी व्यवस्थित पार पडली. आश्चर्याची गोष्ट म्हणजे शस्त्रक्रियेदरम्यान अगदी नगण्य रक्तस्राव झाला! ह्याचे डॉक्टरांना देखील नवल वाटले. त्यानंतरही जिमी अगदी ठीक होता आणि त्याला कसल्याच वेदना होत नव्हत्या. आता त्याची जखम अगदी पूर्णपणे बरी झाली आहे. हा अनुभव माझ्यासोबत नेहमीच राहील.

– सत्वजय ठोकळ

गेल्या एका महिन्यात मी स्वत:बद्दल बरेच काही शिकलो आहे. जेव्हा मी आत्मपरीक्षण करण्यास सुरुवात केली तेव्हा मला ती प्रत्येक गोष्ट समजली ज्यामुळे मला दु:ख होत होते. ह्या सर्व गोष्टींचा स्वीकार करणे, माझ्यातील अहंभावाचा त्याग करून पुढे वाटचाल करणे, हे माझ्यासाठी खूप कठीण होते. पण गुरुजींच्या कृपेने आणि आपल्या मार्गदर्शनामुळे मी ह्या परीक्षेत जेमतेम गुणांनी का होईना, पण उत्तीर्ण झालो. सुधारण्यासारखे व बदलण्यासारखे आणखी बरेच काही आहे.

– मोहन चंद्रबानू

आता प्रकाश माझा सांगाती बनल्याने मी खूप खूष आहे. मला कसल्याही प्रकारचे अजिबात भय नाही. मी इतकी निवांत असते कारण मी परमेश्वरास पूर्णपणे शरण गेले आहे. मी ज्या कशाचीही कामना करते, इच्छा करते, परमेश्वरच त्याची काळजी घेतो. मी आता खूप आनंदी आहे. आणि माझी मैत्री प्रकाशाशी झाल्याने मला खरोखरच धन्य झाल्यासारखे वाटते. मी नेहमी कृतज्ञतेच्या भावनेने जगते.

– अनू सैगल

विस्तारित दृष्टिकोनाने जीवन जगण्याची ओढ मला माझ्यात प्रकर्षाने जाणवते आहे. फक्त स्वत:साठीच किंवा माझ्या कुटुंबासाठीच काही करण्यात आता मला रस वाटत नाही. प्रत्येकासाठी मला भावुक व्हावेसे वाटते आणि सर्वांकरिता काहीतरी करावेसे वाटते. मला असे वाटते की मी 'वैश्विक जीव' बनण्याकडे मार्गक्रमण करीत आहे.

मी मिशीगन येथे एका वृद्ध स्त्रीला भेटलो जी ग्रहण पाहण्याचा आनंद लुटण्याकरिता तेथे समुद्रकिनाऱ्यावर आली होती. तिने आम्हाला सांगितले की बायबलमध्ये नमूद करण्यात आले आहे की ज्या दिवशी येशू ख्रिस्तांना क्रूसावर चढविण्यात आले, त्या दिवशी देखील ग्रहण होते. काही कारणाने तिला वाटत होते की त्या दिवसाच्या स्तब्धतेचा साक्षात्कार तिला त्या ठिकाणी घडत होता. ती अतिशय प्रेमळ होती. आपण कोठेही असलो तरी जे लोक त्यांचे प्रेम आपल्याला देण्यास सदैव तत्पर असतात असे लोक आपल्या अवतीभोवती असावेत ही काळजी गुरुजी नेहमी घेतात. ह्या सर्व भावना शब्दात मांडणे खरोखरच कठीण आहे!

– पुष्कर पत्की

PRAKASHMARG A Marathi Monthly Newspaper, Annual Subscription: Rs. 300/-
Printed, Published and Edited by Jayant Deshpande on behalf of Manasa Foundation (R).
Published from Manasa Foundation (R), Taponagara, Chikkagubbi, Bangalore Urban - 560077 and
Printed at M/s. ART PRINT, 719/A, West of Chord Road, 2nd Stage, Rajajinagar, Bangalore - 560086. Phone : 2335 9992
Owner: Manasa Foundation (R), Taponagara, Chikkagubbi, Bangalore Urban - 560 077.
Editor : Jayant Deshpande